Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844454

# केंद्र-राज्य संबंध आणि भारतीय संघराज्य व्यवस्थे समोरील आव्हाने

डॉ. उमेश विठ्ठलराव खेडकर[1]

## १. गोषवारा :

भारतीय राज्यघटना संघराज्यात्मक तत्त्वांवर आधारलेली असली तरी तिच्या रचनेत एकात्मतेचे घटकही प्रकर्षाने आढळून येतात. विविध भाषा, धर्म, संस्कृती, भौगोलिक परिस्थिती आणि सामाजिक रचना असलेल्या भारतात शासनकारभार प्रभावीपणे चालवण्यासाठी केंद्र व राज्य यांच्यात अधिकारांचे सुयोग्य विभाजन करण्यात आले आहे. या संशोधन लेखात केंद्र–राज्य संबंधांचे विधायी, प्रशासकीय आणि आर्थिक पैलू सविस्तरपणे स्पष्ट केले आहेत. राज्यघटनेतील संबंधित कलमे, सातवी अनुसूची, आपत्कालीन तरतुदी, वित्त आयोग, जीएसटी परिषद, आंतरराज्य परिषद, तसेच सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्णय यांच्या आधारे भारतीय संघराज्याचे स्वरूप विश्लेषित केले आहे. सहकारी व स्पर्धात्मक संघराज्यवाद या संकल्पनांच्या पार्श्वभूमीवर वर्तमान परिस्थितीचे परीक्षण केले आहे. शेवटी संघराज्य अधिक सक्षम, संतुलित आणि लोकाभिमुख करण्यासाठी शिफारशी मांडण्यात आल्या आहेत.

## २. प्रस्तावना :

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भारत हा भौगोलिक, भाषिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विविधतेने समृद्ध देश आहे. अशा विविधतेत राष्ट्रीय एकात्मता टिकवून लोकशाही शासन प्रभावीपणे चालवण्यासाठी राज्यघटना निर्मात्यांनी संघराज्य ही शासन पद्धती स्वीकारली. संघराज्य म्हणजे केंद्र आणि राज्य या दोन स्तरांमध्ये अधिकारांचे संविधानिक विभाजन करून शासनकारभार चालवणे. भारतीय राज्यघटना संघराज्यात्मक तत्त्वांवर आधारित असली तरी देशाच्या अखंडतेचे रक्षण, सुरक्षेची गरज, आर्थिक नियोजन आणि विकासाची समान दिशा यांसाठी केंद्राला तुलनेने अधिक अधिकार देण्यात आले आहे. त्यामुळे भारतीय संघराज्याला अनेक अभ्यासकांनी “क्वासी-फेडरल” किंवा “केंद्राभिमुख संघराज्य” असे संबोधले आहे.

स्वातंत्र्यानंतर देशासमोर विभाजनाची वेदना, प्रादेशिक अस्थिरता, संस्थानांचे विलिनीकरण आणि आर्थिक पुनर्रचना अशी अनेक आव्हाने समोर उभी होती. या पार्श्वभूमीवर राज्यघटना निर्मात्यांनी एकीकडे राज्यांना स्वायत्तता दिली, तर दुसरीकडे केंद्राला आवश्यक ते अधिकार देऊन राष्ट्राच्या एकात्मतेला प्राधान्य दिले. यामुळे भारतीय संघराज्याची रचना ही संतुलित आणि व्यावहारिक ठरली. सातव्या अनुसूचीतील संघ, राज्य व समवर्ती याद्यांद्वारे विधायी अधिकारांचे विभाजन, स्वतंत्र न्यायपालिका, लिखित व सर्वोच्च राज्यघटना, तसेच आपत्कालीन तरतुदी या माध्यमातून केंद्र–राज्य संबंधांची चौकट निश्चित करण्यात आली. काळानुसार केंद्र–राज्य संबंधांचे स्वरूप बदलत गेले. आर्थिक उदारीकरण, जीएसटी प्रणाली, नीती आयोग, वित्त आयोग, आंतरराज्य परिषद, तसेच सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय यांमुळे सहकारी संघराज्यवादाला चालना मिळाली आहे. तरीही राज्यपालांची भूमिका, कलम ३५६ चा वापर,

[1] मौलाना आझाद कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय रोजा बाग, छत्रपती संभाजीनगर

महसूल वाटप, प्रादेशिक राजकारण यांसारख्या मुद्द्यांमुळे केंद्र–राज्य यांच्यातील संबंध ताणल्याचे अधूनमधून दिसून येतात. त्यामुळे भारतीय संघराज्याचे स्वरूप समजून घेण्यासाठी केंद्र–राज्य संबंधांचा विस्तृतपणे अभ्यास करणे आवश्यक होते.

या संशोधन लेखात भारतीय संघराज्याची तत्त्वे, केंद्र–राज्य संबंधांचे विविध पैलू, संविधानिक तरतुदी, आयोगांचे अहवाल आणि वर्तमान परिस्थितीतील आव्हाने यांचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे.  संघराज्य अधिक सक्षम, संतुलित आणि लोकाभिमुख कसे होऊ शकते याचा शोध घेणे हे या लेखाचे मुख्य उद्दिष्ट आहे.स्वातंत्र्यानंतर देशाच्या अखंडतेचे रक्षण, लोकशाही मूल्यांची जपणूक आणि सर्वसमावेशक विकास यासाठी राज्यघटना निर्मात्यांनी संघराज्याची रचना स्वीकारली. परंतु विभाजनानंतरची अस्थिरता, प्रादेशिकतेचे धोके आणि राष्ट्रीय सुरक्षेची गरज लक्षात घेऊन केंद्राला तुलनेने अधिक अधिकार देण्यात आले. म्हणूनच भारतीय संघराज्याला क्वासी-फेडरल असे संबोधले जाते. केंद्र–राज्य संबंधांचा सखोलपणे अभ्यास केल्यास भारतीय संघराज्याचे खरे स्वरूप स्पष्ट होते.

### ३. उद्दिष्टे :

१. भारतीय संघराज्याची संकल्पना व वैशिष्ट्ये समजून घेणे.
२. केंद्र–राज्य संबंधांचे विधायी, प्रशासकीय व आर्थिक पैलू अभ्यासणे.
३. राज्यघटनेतील संबंधित कलमांचे विश्लेषण करणे.

### ४. गृहितके :

१. भारतीय संघराज्य केंद्राभिमुख स्वरूपाचे आहे.
२. आर्थिक साधनसंपत्तीवरील केंद्राचे नियंत्रण अधिक आहे.

### ५. भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये

- लिखित व सर्वोच्च राज्यघटना
- केंद्र व राज्य यांच्यात अधिकारांचे स्पष्ट विभाजन (सातवी अनुसूची)
- स्वतंत्र न्यायपालिका
- दुहेरी शासनपद्धती
- संविधान दुरुस्तीची मिश्र प्रक्रिया
- आपत्कालीन तरतुदी

### ६. केंद्र–राज्य विधायी संबंध (कलम २४५-२५५)

सातवी अनुसूचीतील तीन याद्यांद्वारे अधिकारांचे विभाजन:

Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844454

| यादी | विषय | अधिकार |
|---|---|---|
| **संघ सूची** | संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, रेल्वे, चलन | **केंद्र** |
| **राज्य सूची** | पोलीस, आरोग्य, शेती, स्थानिक प्रशासन | **राज्य** |
| **समवर्ती सूची** | शिक्षण, वन, विवाह, कामगार | **दोन्ही** |

**विशेष तरतुदी:**

- कलम २४९ – राष्ट्रीय हितासाठी राज्य विषयांवर केंद्राचा कायदा
- कलम २५० – आपत्कालीन स्थितीत केंद्राचे अधिकार
- कलम २५२ – दोन किंवा अधिक राज्यांच्या विनंतीवर केंद्राचा कायदा

**७. प्रशासकीय संबंध (कलम२५६–२६३)**

राज्यांनी केंद्राच्या कायद्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक.

राष्ट्रपती राज्यांना निर्देश देऊ शकतात.

राज्यपालांची नियुक्ती केंद्राकडून.

आंतरराज्य परिषद (Inter-State Council) सहकार्याचे साधन.

**८. आर्थिक संबंध (कलम२६८– २९३)**

भारतीय संघराज्याची खरी कसोटी आर्थिक संबंधात दिसते.

करांचे विभाजन

वित्त आयोग (कलम२८०) – महसूल वाटप

अनुदाने (Grants-in-aid)

जीएसटी परिषद (कलम२७९अ) – सहकारी संघराज्यवादाचे उत्कृष्ट उदाहरण

जीएसटीमुळे केंद्र व राज्य यांच्यात समन्वय वाढला असून करप्रणाली सुसंगत झाली आहे.

**९. आणीबाणी संदर्भातील तरतुदी व संघराज्य**

| प्रकार | कलम | परिणाम |
| --- | --- | --- |
| राष्ट्रीय आणीबाणी | ३५२ | संघराज्य एकात्मतेत परिवर्तित |
| राज्य आपत्काल | ३५६ | राज्य शासन बरखास्त |
| आर्थिक आणीबाणी | ३६० | आर्थिक अधिकार केंद्राकडे |

या तरतुदींमुळे केंद्र शासनाचे अधिकार हे प्रबळ होत असल्याचे अधोरेखित होताना दिसून येते.

**१०. सर्वोच्च न्यायालयाचे काही महत्वपूर्ण निर्णय**

**केशवानंद भारती (१९७३) –** सर्वोच्च न्यायालयाच्या १३ न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. संसदेला संविधान दुरुस्तीचा अधिकार आहे, पण ती घटनेच्या 'मूलभूत रचनेत' बदल करू शकत नाही, असे स्पष्ट केले आहे.सर्वोच्च न्यायालयाने या निकालात धर्मनिरपेक्षता, संघराज्य, लोकशाही, न्यायालयीन पुनर्विलोकन यांसारख्या गोष्टी मूलभूत रचनेचा भाग असल्याचे स्पष्ट केले आहे.

**एस.आर. बोमाई (१९९४) –** या निर्णयामुळे कलम ३५६ (राष्ट्रपती राजवट) च्या अति गैरवापरावर लगाम लावला आहे. राज्य सरकार बरखास्त करण्यापूर्वी विधानसभेतील बहुमत सिद्ध करणे अनिवार्य केले आहे. तसेच 'राज्ये ही केंद्राच्या अधीन नसून स्वतंत्र घटक आहेत', असे स्पष्ट करून संघराज्याचे महत्व व त्याचे अस्तित्व बळकट केले आहे. तसेच, धर्मनिरपेक्षपणा हा देखील भारतीय संविधानाचा मूलभूत गाभा असल्याचे या निकालामध्ये स्पष्ट केले आहे.

**पश्चिम बंगाल वि. केंद्र (१९६३) –** या खटल्या मध्ये न्यायालयाने संविधानातील केंद्राचे वर्चस्व मान्य केले असले तरीही, हे वर्चस्व मर्यादित असून ते राज्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाला पूर्णपणे नष्ट करू शकत नाही, असे नंतरच्या निर्णयातून (उदा. बोमाई खटला) स्पष्ट झाले आहे. या महत्वपूर्ण निकालामुळे भारतीय लोकशाही मध्ये न्यायालय, संसद आणि राज्य सरकारांमधील अधिकारांचा समतोल राखण्याचे ऐतिहासिक कार्य केले आहे.

**११. आयोगांचे अहवाल** :भारतात केंद्र–राज्य संबंध अधिक संतुलित, सहकार्यपूर्ण आणि परिणामकारक व्हावेत यासाठी केंद्र सरकारने वेळोवेळी तज्ज्ञ आयोग नेमण्यात आले होते. हे आयोग नेमण्याचा मुख्य हेतू केंद्र–राज्य संबंधांचा सर्वांगीण आढावा घेऊन सुधारणा सुचवणे. त्यातील सरकारिया आयोग (१९८३) आणि पंची आयोग (२००७) हे अत्यंत महत्त्वाचे मानले जातात.

**(अ) सरकारिया आयोग अध्यक्ष:** न्यायमूर्ती आर. एस. सरकारिया **अहवाल:** १९८८

**प्रमुख शिफारशी:**

- संघराज्याचे संतुलन: केंद्र मजबूत असावे; पण राज्यांच्या स्वायत्ततेचा आदर राखावा.
- कलम ३५६ चा मर्यादित वापर: राज्य आपत्कालीन तरतूद अपवादात्मक परिस्थितीतच वापरावी.
- राज्यपालांची भूमिका: राज्यपाल पक्षनिरपेक्ष व अनुभवी व्यक्ती असावी; राज्याच्या राजकारणात हस्तक्षेप टाळावा.
- आंतरराज्य परिषद: कलम २६३ अंतर्गत आंतरराज्य परिषद सक्रिय करावी.
- वित्तीय संबंध: वित्त आयोग अधिक प्रभावी करावा; राज्यांना न्याय्य महसूल वाटप.
- समवर्ती सूची: या यादीतील विषयांवर केंद्राने राज्यांशी सल्लामसलत करावी.

सरकारिया आयोगाने सहकारी संघराज्यवादाचा पाया अधिक मजबूत करण्यावर भर दिला असल्याचे दिसून येते.

**(ब) पंची आयोग, २००७ अध्यक्ष:** न्यायमूर्ती मदन मोहन पंची **अहवाल:** २०१०

**प्रमुख शिफारशी:**

- राज्यपालांनी विवेकाधिकाराचा गैरवापर करू नये.

- राज्यातील कायदा-सुव्यवस्था बिघडल्यास केंद्राने थेट हस्तक्षेप करण्याऐवजी सहकार्याचा मार्ग स्वीकारावा.

**- आंतरराज्य परिषद बळकट करणे:** नियमित बैठक व प्रभावी निर्णयप्रक्रिया.

**- आर्थिक स्वायत्तता:** राज्यांना अधिक करसंकलनाचे अधिकार.

**- स्थानिक स्वराज्य संस्था:** संघराज्य बळकट करण्यासाठी स्थानिक पातळीवर अधिकारवाटप.

**- आंतरिक सुरक्षा:**.पंची आयोगाने आधुनिक काळातील संघराज्य आव्हानांना उत्तर देण्यासाठी व्यावहारिक उपाय सुचवले. एकूणच या दोन्ही आयोगांनी केंद्र–राज्य संबंध अधिक सहकार्यपूर्ण, पारदर्शक आणि संतुलित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे दिली. आजही राज्यपालांची भूमिका, कलम ३५६, वित्तीय स्वायत्तता आणि आंतरराज्य परिषद या संदर्भात या आयोगांच्या शिफारशी महत्त्वाच्या मानल्या जातात.

**१२. सहकारी व स्पर्धात्मक संघराज्यवाद :-**

नीती आयोग, जीएसटी परिषद, वित्त आयोग → सहकारी संघराज्यवाद

गुंतवणूक, उद्योग, Ease of Doing Business → स्पर्धात्मक संघराज्यवाद

**१३. वर्तमान परिस्थितीतील संघराज्य व्यवस्थे समोरील आव्हाने :-**

भारतीय संघराज्य व्यवस्था संविधानिकदृष्ट्या संतुलित असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात केंद्र–राज्य संबंधांमध्ये विविध प्रकारची आव्हाने दिसून येतात. बदलती राजकीय परिस्थिती, आर्थिक धोरणे, प्रशासकीय हस्तक्षेप आणि प्रादेशिक राजकारण यांमुळे तणाव निर्माण होतो. ही आव्हाने पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात:

**१३.१) राज्यपाल–मुख्यमंत्री तणाव :-**

राज्यपालांची नियुक्ती केंद्राकडून होत असल्याने काही वेळा राज्य सरकार व राज्यपाल यांच्यात मतभेद निर्माण होतात. विधेयकांना मंजुरी देण्यात विलंब, विधानसभा बोलावण्याबाबतचे निर्णय, बहुमत चाचणीच्या संदर्भातील हस्तक्षेप इत्यादी कारणांनी वाद निर्माण होतात. या सारख्या घटनांमुळे व निर्णयामुळे राज्यांच्या स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे निर्देशनास येते.

**१३.२) कलम ३५६ चा वापर :-**सर्वोच्च न्यायालयाने एस.आर. बोमाई प्रकरणात मर्यादा घातल्या असल्या तरी काही प्रसंगी राष्ट्रपती राजवट लावण्याबाबत राजकीय वाद उद्भवतात. राज्य शासन बरखास्त करण्याच्या निर्णयामुळे संघराज्याच्या तत्त्वांवर परिणाम होत असल्याचे दिसून येतो.

**१३.३) जीएसटी महसूल भरपाई व आर्थिक तणाव :-**.जीएसटी लागू झाल्यानंतर राज्यांचे स्वतंत्र करसंकलन कमी झाले. जीएसटी भरपाईबाबत केंद्र व राज्यांमध्ये मतभेद निर्माण झाले. यामुळे राज्यांच्या आर्थिक स्वायत्ततेचा प्रश्न पुढे आला आहे.

**१३.४) आर्थिक स्वायत्ततेचा अभाव :-** राज्यांच्या महसूल स्रोतांवर मर्यादा असल्याने त्यांना केंद्रावर अवलंबून राहावे लागते. अनुदाने व वित्त आयोगाच्या शिफारशींवर राज्यांचा मोठा भर असतो.

**१३.५) प्रादेशिक राजकारण व राजकीय भिन्नता :-** केंद्र व राज्यात वेगवेगळया पक्षांचे सरकार असल्यास धोरणांवर मतभेद होतात. यामुळे विकास प्रकल्प, कायदे आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये अडथळे येतात.

**१३.६) आंतरराज्य जलवाटप व सीमा वाद :-** कावेरी, कृष्णा, नर्मदा यांसारख्या नद्यांच्या पाण्याच्या वाटपावरून राज्यांमध्ये वाद निर्माण होतात. सीमावादामुळेही तणाव वाढतो.

**१३.७) केंद्रीय यंत्रणांचा वापर :-** सीबीआय, ईडी, आयकर विभाग यांसारख्या केंद्रीय यंत्रणांच्या कारवायांबाबत काही राज्यांनी राजकीय हेतूंचा आरोप केला आहे. यामुळे केंद्र–राज्य यांच्या संबंधातील विश्वासाहर्ता कमी होते.

**१३.८) स्थानिक स्वराज्य संस्थांकडे दुर्लक्ष :-**संघराज्य मजबूत होण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था सक्षम असणे आवश्यक आहे. परंतु अनेक राज्यांत त्यांना अपेक्षित आर्थिक व प्रशासकीय अधिकार दिले जात नाहीत.

**१३.९) आंतरराज्य परिषदेचे अपुरे कार्य :-** आंतरराज्य परिषद नियमितपणे सक्रिय नसल्यामुळे संवादाची प्रभावी यंत्रणा कमी पडते. वरील आव्हानांमुळे केंद्र–राज्य संबंधांमध्ये तणाव निर्माण होतो आणि सहकारी संघराज्यवादाची प्रक्रिया अडथळली जाते. या आव्हानांवर उपाययोजना केल्यास भारतीय संघराज्य अधिक सुदृढ व परिणामकारक होऊ शकते.

**१४. निष्कर्ष :-**

भारतीय संघराज्य व्यवस्था केंद्राभिमुख असली तरी राज्यांना संविधानिक स्वायत्तता प्रदान करते. विधायी, प्रशासकीय व आर्थिक अधिकारांचे विभाजन स्पष्ट असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात केंद्राचे वर्चस्व दिसून येते. जीएसटी परिषद, वित्त आयोग आणि नीती आयोग यांसारख्या यंत्रणांमुळे सहकारी संघराज्यवादाला चालना मिळाली आहे. तथापि, राज्यपालांची भूमिका, कलम **३५६** चा वापर, तसेच महसूल वाटपावरील मतभेद यामुळे केंद्र–राज्य संघर्ष निर्माण होत असल्याचे दिसून येते. संघराज्याची परिणामकारकता ही परस्पर विश्वास, संवाद आणि समन्वयावर अवलंबून आहे. भारतीय संघराज्य विविधतेत एकता राखण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. केंद्र आणि राज्य यांच्यातील सत्तावाटप संविधानिक चौकटीत संतुलित असले तरी व्यवहारात सहकार्य करण्याची आवश्यकता अधिक आहे. सहकारी आणि स्पर्धात्मक संघराज्यवादाच्या माध्यमातून विकासाची गती वाढू शकते. संघराज्य अधिक सक्षम करण्यासाठी राज्यांना आर्थिक व प्रशासकीय स्वायत्तता देणे, राज्यपालांच्या अधिकारांचे पुनर्मूल्यांकन करणे आणि आंतरराज्य संवाद वाढवणे आवश्यक आहे. परस्पर विश्वास आणि सहकार्य यांवरच भारतीय संघराज्याची यशस्विता अवलंबून आहे.

**१६. शिफारशी :**

भारतीय संघराज्य अधिक सक्षम, संतुलित आणि सहकार्यपूर्ण व्हावे यासाठी केंद्र–राज्य संबंधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. पुढील शिफारशी संघराज्य बळकट करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात:

१) संविधानातील कलम २६३ अंतर्गत स्थापन केलेली आंतरराज्य परिषद ही केंद्र–राज्य संवादासाठी महत्त्वाची यंत्रणा आहे. तिच्या नियमितपणे बैठका घेण्यात याव्यात. निर्णयप्रक्रिया पारदर्शक व वेळबद्ध असावी.धोरणात्मक विषयांवर (शिक्षण, आरोग्य, शेती, अंतर्गत सुरक्षा) सखोल चर्चा व्हावी.  यामुळे परस्पर समन्वय वाढेल आणि मतभेद टाळता येतील.

२) राज्यपाल हे राज्यघटनेनुसार राज्याचे प्रमुख असले तरी त्यांची नियुक्ती केंद्राकडून होते. राज्यपालांची नियुक्ती करताना तटस्थ, अनुभवी आणि राजकीयदृष्ट्या निष्पक्ष व्यक्तींची निवड करावी.  विवेकाधिकाराच्या वापरावर स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे असावीत. विधेयकांना मंजुरी देण्यात अनावश्यक विलंब टाळावा. यामुळे राज्य–केंद्र तणाव कमी होईल.

३) कलम **३५६** चा अपवादात्मक वापर राष्ट्रपती राजवट लावण्याची तरतूद अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतच वापरावी.सर्वोच्च न्यायालयाच्या **एस.आर. बोमाई** निर्णयातील निकषांचे काटेकोर पालन करावे.

प्रथम बहुमत चाचणी विधानसभा सभागृहात घ्यावी.यामुळे संघराज्य तत्त्वांचे रक्षण होईल.

४) वित्तीय स्वायत्तता वाढवणे राज्यांच्या विकासासाठी आर्थिक स्वायत्तता अत्यंत आवश्यक आहे. कर संकलनात राज्यांचा वाटा वाढवावा. वित्त आयोगाच्या शिफारशी वेळेवर अंमलात आणाव्यात.

जीएसटी परिषदेतील निर्णय अधिक सहमतीने घ्यावेत. यामुळे राज्यांना स्वतंत्र धोरण राबवता येईल.

५) नीती आयोग, जीएसटी परिषद आणि विविध क्षेत्रीय परिषदा या मंचांद्वारे सहकार्य वाढवावे.

राज्यांच्या सूचनांना धोरणनिर्मितीत महत्त्व द्यावे. संयुक्त प्रकल्प (आरोग्य, पायाभूत सुविधा, शेती) राबवावेत.

७) जलवाटप, सीमावाद यांसारख्या प्रश्नांसाठी स्वतंत्र, जलद आणि निष्पक्ष न्यायनिवाडा यंत्रणा असावी.

नदी जलवाटप न्यायाधिकरणांचे निर्णय वेळेत द्यावेत.

८) संघराज्य केवळ केंद्र व राज्यांपुरते मर्यादित नसून स्थानिक पातळीवरही सशक्त असणे गरजेचे आहे. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. ग्रामपंचायत, नगरपालिका यांना आर्थिक व प्रशासकीय अधिकार वाढवावेत.

भारतीय संघराज्य अधिक सक्षम करण्यासाठी संविधानिक तरतुदींचा आदर, आर्थिक संतुलन, राजकीय सहकार्य आणि प्रभावी संवाद असणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य यांच्यातील विश्वास, पारदर्शकता आणि सहकार्य या सर्व बाबींवर लक्षपूर्वक काळजी घेतल्यास व प्रभावीपणे हाताळल्यास भारतीय संघराज्य अधिक लोकाभिमुख व परिणामकारक ठरेल.

संदर्भ:

१. 1.Basu, D. D. (2018). Introduction to the Constitution of India.
२. 2.Austin, G. (1999). The Indian Constitution: Cornerstone of a Nation.
३. 3.Jain, M. P. (2016). Indian Constitutional Law.
४. 4.Sarkaria Commission Report (1988).
५. 5.Punchhi Commission Report (2010).
६. 6.Supreme Court Judgements: Kesavananda Bharati, S.R. Bommai.
७. 7.Constitution of India.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*